SMART
PARTNERSHIP FOR PROSPERITY

# मा बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)

## सामाजिक व्यवस्थापन आराखडा



श्री. आशिष दुधे


समाज विकास तज्ञ

विभागीय अंमलबजावणी कक्ष, नागपूर

मो.७९७२९५३६८९

# सामाजिक सुरक्षितता




सामाजिक व्यवस्थापन आराखडा
१. सामाजिक समावेशन
२. जेंडर् स्ट्रॅटजी
३. जागतिक बँक धोरण
४. कामगार आरोग्य व सुरक्षा
५. तक्रार निवारण व्यवस्थापन
३.१ आदिवासी विकास आराखडा
३.२ अनैच्छिक पुनर्वसन


# स्मार्ट प्रकल्पाचे उद्दिष्ट

"राज्यातील अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकरी आणि कृषि उद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून स्पर्धात्मक व सर्वसमावेशक कृषिमूल्यसाखळ्या विकसित करणे."

# १. सामाजिक समावेशन - प्रकल्पामध्ये विविध लाभार्थी घटकांचा समावेश

| प्रवर्ग | भारत | महाराष्ट्र |
|---|---|---|
| १. अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी | 86% | 80% |
| २. महिला | 14% | 15% |
| ३. अनुसूचित जाती | 11.8% | 7% |
| ४. अनुसूचित जमाती | 8.6 % | 6% |

स्रोत : कृषी गणना २०१५-१६



# सामाजिक समावेशन

मूल्य साखळी विकास शाळा (VCDS)

प्रशिक्षण

**अभ्यासदौरे**

**निविष्ठा वाटप**

**गोदाम पावती**


**प्रात्यक्षिके**

**Outreach**

**सर्टिफिकेशन**

# २. जेंडर् स्ट्रॅटजी (Gender Strategy )






कृषी मूल्य साखळीमध्ये महिलांचा सहभाग

# Gender Strategy

एकूण संस्थापैकी ३० टक्के महिला संस्था

समुदाय आधारित संस्थेमध्ये ३० टक्के महिला भागधारक

समुदाय आधारित संस्थेमध्ये २० टक्के महिला संचालक

# ३० % महिला भागधारक असल्याचे प्रमाणपत्र

**RESHIMGOLD FARMER PRODUCER COMPANY LIMITED**

CIN NO: U01409MH2021PTC372511
Reg.Add:C/O ANIKET SAMAJIK SHIKSHAN SANSTHA
26/10,DHANORA(BK)TQ.DIGRAS,DIST.YAVATMAL,MAHARASHTRA,INDIA-445203
EMAIL reshimgold@gmail.com MO.NO.8857091111

26

दिनांक

## प्रमाणपत्र

विषय :- समुदाय आधारित संस्थेत 30 टक्के महिला समभागधारक असल्याचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की रेशीमगोल्ड फार्मर प्रोड्यूसर कंपनी ली या शेतकरी उत्पादक कंपनी मध्ये एकूण 388 समभाग धारक असून त्या पैकी 30% महिला संख्या 118 महिला ह्या रेशीमगोल्ड फार्मर प्रोड्यूसर कंपनी ली च्या समभाग धारक आहे.

करिता रेशीमगोल्ड फार्मर प्रोड्यूसर कंपनी ली कडून प्रमाणित करण्यात येत आहे.

| संचालक | संचालक | |
|---|---|---|
| पवार | रविंद्र मा. राऊत | रामेश्वर द |
| 09418566 | DIN NO 09418565 | DINNO |

For Reshimgold Farmer Producer Co.Ltd
Director / Authorised Signatory

For Reshimgold Farmer Producer Co.Ltd
Director / Authorised Signatory

# अभिवचन

**बजरंग बली फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड**

वारखेड ता.तेल्हारा जि. अकोला ४४४१०३

CINU01403MH2015PTC262723

| ✻ अध्यक्ष ✻ | | ✻ सचिव ✻ |
|---|---|---|
| सत्यनारायण गो. म्हसाये | | प्रल्हाद शंकर म्हसाये |
| मो.नं.9822535953 | Email: jbajarangbalifpo.akola@gmail.com | मो.नं.8668948978 |

Bajarang Bali Farmers Pro.Co.Ltd. Warkhed
Ref.No. 2023/78
Date 01/01/2023

दिनांक : 01 / 01 / 2023

## अभिवचन

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत आमच्या बजरंगबली फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. वारखेड या संस्थेस सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास प्राथमिक मान्यता देण्यात आलेली आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल चा भाग म्हणून आमच्या संस्थेच्या वतीने. । खालीलप्रमाणे अभिवचन देण्यात येत आहे.

१. संस्थेच्या संचालक मंडळास एक कुटुंबातील एकापेक्षा जास्त संचालक नाहीत.

२. प्रकल्प मंजुरीनंतर संस्थेस नफा झाल्यास नफ्यापैकी किमान २५% नफ्का भागधारकांना लाभांश स्वरुपात थेट लाभ हस्तांतरणाने (डीबीटी) वाटप़ करण्याची हमी देण्यात येत आहे. या प्रमाणे नफा वाटप केल्याशिवाय स्मार्ट प्रकल्पातून द्वितीय व तृतीय अनुदान हफ्ता वितरीत होणार नाही याची आम्ही नोंद घेतली आहे.

३. प्रकल्प मंजुरीनंतर अनुदानाचा अंतिम हफ्ता मिळणेपूर्वी अल्प व अत्यल्प भूधारक भागधारकांची संख्या ८० % महिला शेतकरी भागधारकांची संख्या ३० % संचालक मंडळात महिलांची संख्या किमान २० % अनुसूचित जाती व जमाती शेतकरी भागधारकांची संख्या हि या प्रवर्गातील जिल्ह्याच्या शेतकरी संस्थेच्या प्रमाणात ठेवणे बाबत आमची संस्था बांधील आहे.

S.G. Mhasaye.
संचालक
Chairman/Secretary
Bajarangbali Farmer's Producer
Company Ltd. Warkhed
Tq.Telhara Dist.Akola

Bajarang Bali Farmers Producer Com.Ltd.Warkhed
CIN NO.1403
MH 2015
PTC 262723

# स्मार्ट कॉटन



**महिलांचा प्रकल्पात सहभाग वाढविण्याच्या अनुषंगाने प्रकल्प आराखडा**

महिलेच्या नावावर ७/१२ नसले तरी CLF व CMRC सदस्य असलेले शेतकरी कुटुंबातील महिला हया लाभ धारक.

–प्रशिक्षण, शेती शाळा ,माहिती तंत्रज्ञान, जिनिंग मिल, मार्केट ई संसाधनपर्यंत पोच

दर्जेदार व कडीकचरा विरहित कापसचे उत्पादन. लिन्ट आधारित स्मार्ट कापूस गाठीचा लिलाव
-विपणणा मध्ये सहभाग

महिला संस्था/महिला शेतकरी/उत्पादक -निर्णय प्रक्रियेत सहभाग

महिलांचा स्पर्धात्मक कृषीमुल्य साखळीमध्ये सक्रिय सहभाग

**महिलांचा काढणीपश्चात व्यवस्थापन व विपनण प्रक्रियेत सहभाग**

# ३.जागतिक बँक धोरण



आदिवासी विकास आराखडा




अनैच्छिक पुनर्वसन

# आदिवासी विकास आराखडा

१३ जिल्हे - ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर

| | |
|---|---|
| **59** तालुका,<br>ग्रामपंचायती-2872,<br>गाव -5873 | महाराष्ट्रात खालील 47 जमाती प्रामुख्याने आढळून येतात<br>भिल, कातकरी, कोलाम, गोंड, कोळी महादेव, वार्ली, कोकणा, ठाकूर, आंध इ. |

# नागपूर विभागातील आदिवासी जिल्हे

## गडचिरोली (पूर्णता)

- एटापल्ली
- सिरोंचा
- अहेरी
- धानोरा
- कुरखेडा
- भामरागड
- कोरची

## गडचिरोली (अंशता)

- गडचिरोली
- आरमोरी
- चामोर्शी
- मुलचेरा
- वडसा देसाईगंज

# नागपूर विभागातील आदिवासी जिल्हे

चंद्रपूर (अंशता)

- राजुरा
- कोपरणा
- जिवती

# आदिवासी विकास आराखडा

**उद्देश**

- प्रकल्पाच्या विविध उपक्रमांमध्ये आदिवासींचा सहभाग वाढविणे
- त्यांना इतरांच्या बरोबरीने प्रकल्पाचा लाभ मिळवून देणे

प्रकल्पामध्ये उपलब्ध असणा-या संधीबाबत जागृती

प्रकल्पाच्या फायदयापासून वंचित राहणार नाहीत याची खातरजमा

प्रकल्पाच्या विविध उपक्रमाचा त्यांचावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता

# आदिवासी विकास आराखडा- प्रक्रिया

उपप्रकल्पातील आदिवासी शेतक-यांची त्याना पुर्वकल्पना देवून बैठक घेणे व सदर बैठकीमध्ये त्यांना समजेल अशा भाषेत प्रकल्पाची माहिती देणे

प्रकल्पामध्ये सहभागी होण्याकरीता संमती घेणे

प्रकल्पातील सर्व उपक्रमात- उदा - प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, अभ्यासदौरा, निविष्ठा वाटप, सर्टिफिकेशन , संचालक, कामगार , प्रशिक्षक सहभाग व फायदे

# ग्रामपंचायत प्रमाणपत्र

प्रपत्र -२

ग्रामपंचायत ..........................

दि. / /२०२२

**प्रमाणपत्र**

प्रमाणीत करण्यात येते की, दिनांक...................... रोजी मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय ग्रामीण विकास (स्मार्ट) प्रकल्पातंर्गत, ............................................ .......... ........... ...........समुदाय आधारीत संस्थेमार्फत गावामध्ये प्रकल्प राबविण्याकरीता बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये गावातील आदीवासी समुहातील............. संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या संस्थेमार्फत........................................................ हा उपक्रम गावात राबविण्यात येणार असून त्याबाबत चर्चा करण्यात आली.

सदर उपक्रमाच्या माध्यमातून आदीवासी समुदायास कोणत्याही प्रकारची हानी पोहचणार नाही. या उपक्रमामुळे गावातील आदीवासी ग्रामस्थास (स्त्री व पुरुष) यांना रोजगार उपलब्ध होणार असून त्यांना या प्रकल्पाच्या विविध उपक्रमांचा फायदा मिळणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प गावात राबविण्याकरीता आदीवासी समुदायाची व ग्रामपंचायत यांची संमती देण्यात येत आहे.

| ग्रामसेवक यांचे नाव व स्वाक्षरी | सरपंच यांचे नाव व स्वाक्षरी |
|---|---|
| ...................................... | ...................................... |
| ...................................... | ...................................... |
| ...................................... | ...................................... |

# सभेत उपस्थित ग्रामस्थांची यादी

**सभेस उपस्थित आदिवासी ग्रामस्थांची यादी** **दि. / /२०२२**

| अ.क्र. | नाव | महिला / पुरुष | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १) | | | |
| २) | | | |
| ३) | | | |
| ४) | | | |
| ५) | | | |
| ६) | | | |
| ७) | | | |
| ८) | | | |
| ९) | | | |
| १०) | | | |
| ११) | | | |
| १२) | | | |
| १३) | | | |
| १४) | | | |
| १५) | | | |
| १६) | | | |
| १७) | | | |
| १८) | | | |
| १९) | | | |
| २०) | | | |
| २१) | | | |
| २२) | | | |
| २३) | | | |
| २४) | | | |



# अतिक्रमण नसल्याचे प्रमाणपत्र

प्रपत्र -३

जागा अतिक्रमण मुक्त असल्याचे प्रमाणपत्र

सबब प्रमाणपत्र देण्यात येते की, ----- ग्रामपंचायत कार्यालय हद्दीतील गट क्र. ---- पैकी ----- आर क्षेत्र ------------------------ यांनी भाडेपट्टा कराराद्वारे ---------------------यांना दिलेले आहे. सदरील जागेवर कंपनी मार्फत स्मार्ट प्रकल्पांअंतर्गत ---------------------------हे उपक्रम घेण्यात येणार आहे . सदरील जागा ही अतिक्रमणमुक्त असून सदर जागेवर कोणीही बेकायदेशीर घुसखोरी केलेली नाही. तसेच सदर जागेवर कोणतेही अधिकृत व अनधिकृत बांधकाम केलेले नाही.

दिनांक

नाव, सही व शिक्का

ग्रामपंचायत अधिकारी /संबंधीत अंमलबजावणी कक्षाचे जिल्हा अधिकारी

# कामगार आरोग्य व सुरक्षा..

पायाभूत सुविधांच्या बांधकामाकरीता कामगार आरोग्य व सुरक्षा कृती आराखडा सदर बांधकामाकरीता नेमलेले कंत्राटदार यांच्याकरवी करुन घेणे आवश्यक. हा आराखडा कंत्राट दारच्या करारामद्धे नमूद असणे अनिवार्य

उद्देश - कामगारांना मुलभूत सुविधा पुरविणे व त्याच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी घेणे हा आहे.

# आरोग्य आणि सुरक्षा :कामाच्या ठिकाणी पुरुष तसेच महिला कामगारांसाठी आरोग्यदायी व सुरक्षित वातावरण निर्माण करणे

- पिण्याच्या पाण्याची सोय
- प्रथमोपचाराची व्यवस्था
- पुरुष आणि महिला कामगारांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था
- गरोदर किंवा स्तनपान करणाऱ्या महिला कामगारांना त्यांच्या आरोग्याला बाधा पोहोचवू शकणारे कुठलीही धोकादायक कामे दिली जाणार नाहीत याची काळजी शेतकऱ्याने घेणे गरजेचे आहे.
- अवजड किंवा धोकादायक वाहने/अवजारे हाताळणाऱ्या कामगारांचा आरोग्य सुरक्षा विमा काढणे गरजेचे आहे.



# कामगार आरोग्य व सुरक्षितता- माहिती फलक






## बाल कामगार प्रतिबंध
## शेतकऱ्याने १४ वर्षापेक्षा लहान बालकांची शेतातील कामाकरिता नेमणूक करू नये.

- शेतकऱ्याने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे १४ वर्षांचे आतील मुलांची कामगार म्हणून नेमणूक करू नये.
- जी कामे केल्यामुळे मुलांच्या शारीरिक, मानसिक किंवा नैतिक आरोग्य,सुरक्षा तसेच मनोबलावर विपरित परिणाम होणार असेल तर १८ वर्षाखालील मुलांना अशी कामे देण्यात येऊ नयेत. उदाहरणार्थ कीटकनाशकांसारख्या वस्तू, ट्रॅक्टरचा वापर, पीक कापणी यंत्र हाताळणे.





# माहिती फलके (बालकामगार प्रतिबंध)



## वेठबिगारीला प्रतिबंध -शेतकऱ्याने कुठल्याही स्वरुपात दबावाने अथवा वेठबिगारीने महिला व पुरुष कामगार नियुक्त करू नयेत

- शेतकऱ्याने कुठल्याही स्वरुपामध्ये सक्तमजूर, दबावग्रस्त, वेठबिगार, अनैतिक अथवा अनैच्छिक कामगार नेमू नये.
- कामगाराने योग्य ती सूचना देत काम सोडण्याचे ठरविल्यास शेतकऱ्याने त्याचा काम सोडण्याचा अधिकार मान्य करीत त्याला तशी अनुमती द्यावी.
- शेतकऱ्याने शिस्तीचे कारण पुढे करीत कामगारास अन्न, पाणी, स्वच्छतागृहे अथवा आरोग्य सेवांपासून वंचित ठेवू नये.
- कामगाराने त्याच्या कार्यकाळात प्राप्त केलेले वेतन, प्रमाणपत्रे, ओळखपत्रे, कुठल्याही प्रकारचे लाभ, संपत्ती किंवा हक्क शेतकऱ्याने रोखून ठेवायला नकोत.



# भेदभावास प्रतिबंध

- एक सारख्या किंवा समान स्वरुपाच्या कामासाठी पुरुष आणि महिला कामगाराना  समान वेतन/मजूरी देण्यात यावी .
- सेवा भरतीच्या काळात पुरुष आणि विशेषत: महिला कामगारांच्या संदर्भात लिंग आधारीत अथवा वैवाहिक स्थितीवर आधारीत भेदभाव करु नये
- महिला कामगारांनी विवाह करु नये किंवा मूल होऊ नये यासाठी शेतकरी महिला कामगारांना कुठल्याही प्रकारचा  दबाव आणता येणार नाही किंवा त्यांच्या रोजगारावर कुठलाही नकारार्थी परिणाम करणारी कृती करु नये .
- लिंगआधारीत कामाची विभागणी न करता कौशल्याआधारित कामाची विभागणी करणे गरजेचे आहे.



# सुरक्षा

- शेतीमध्ये औषधे व कीटकनाशकांचा वापर केला जात असतांना पुरुष आणि महिला कामगारांना सुरक्षित पोशाख देण्याची शेतकऱ्याची जबाबदारी राहिल. सुरक्षित पोशाखामध्ये खालील बाबींचा समावेश असेल.
  अ) पूर्ण लांबीचा अंगरखा - डोक्यावरील हॅट ब) हाताच्या कोपरापर्यंत घातले जाणारे रबरी मोजे, ज्यामुळे द्रव पदार्थापासून संरक्षण होऊ शकेल क) धूळ प्रतिबंधक चष्मा ड) पायातील बूट इ) श्वास घेण्यासाठी योग्य असे वायु कवच (मास्क)
- कामगारांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना दिल्या गेलेल्या साधनांचा वापर करण्यासंदर्भात पुरुष आणि महिला कामगारांना आवश्यक प्रशिक्षण
- फवारणी संपल्यानंतर लगेचच फवारणी क्षेत्रात माणसे/प्राण्यांना जाऊ देवू नये.
- उपाशीपोटी फवारणी न करता फवारणीपूर्वी न्याहारी करावी.
- फवारणी मिश्रण करतांना अथवा प्रत्यक्ष फवारणीवेळी तंबाखु खाणे वा धुम्रपान करणे कटाक्षाने टाळावे.
- फवारणीचे काम पूर्ण झाल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुवावे व नंतरच खाणे-पिणे करावे.



# कामगार आरोग्य व  सुरक्षितता





लखदातर फार्मर प्रोड्युसर कंपनी चांदूर रेल्वे

# कामगार आरोग्य व सुरक्षितता






# माहिती फलके


बालमजुरीला विरोध / बालमजुरीचा निषेध
SAY NO TO
CHILD LABOUR
Child Labour Prohibited


निसर्गाचा ऱ्हास नका करू
चला पर्यावरण वाचवू
Protect Biodiversity.
Protect Earth.

# कामगार आरोग्य व सुरक्षितता



# कामगार आरोग्य व सुरक्षितता-VCDS & SMART COTTON



# सुरक्षा

- शेतकऱ्याने माणसांसाठीचे अन्नपदार्थ आणि पशूंचे खाद्य ज्याठिकाणी ठेवल्या जाते, तिथे किटकनाशकांची साठवणूक करु नये.
- शेतकऱ्याने कीटकनाशके मुलांपासून दूर ठेवली जातील यासंदर्भात काळजी घ्यावी.
- फवारणी करतांना जवळपास अन्य असंबंधित व्यक्ती जसे कि गरोदर माता, स्तनपान करणारे माता असणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- फवारणीचे मिश्रण हाताने न ढवळता लांब लाकडी दांड्याचा किंवा काठीचा वापर करावा.
- फवारणी करताना वारे वाहणाऱ्या दिशेला तोंड करून फवारणी करावी. वारे वाहण्याच्या विरुद्ध दिशेला तोंड करून किटकनाशक फवारणी केल्यास त्याचा फवारा मोठ्या प्रमाणात शरीरावर पडून विष भिनण्याची प्रक्रिया होऊ शकते.













Never mix pesticides with plain hands without wearing gloves

Never store pesticides near food / utensils or in children's access



Never Spray from opposite direction of wind flow




- किटकनाशके शेतात फवारल्यानंतर त्यावरील मार्गदर्शक सुचनानुसार (किटकनाशकाच्या तीव्रतेनुसार) शेतामध्ये जाणे टाळावे.
- पिकांवर किटकनाशकाची फवारणी करतांना शक्यतो सकाळच्या सत्रात वारे नसताना करावी कारण उष्ण, दमट व प्रखर उन्हामध्ये किटकनाशकाशी संपर्क आल्यास शरीरात विष भिनण्याची प्रक्रिया वेगाने होऊ शकते.
- किटकनाशकाला हुंगणे किंवा त्याचा वास घेणे टाळावे.

# कामाच्या ठिकाणी स्त्रियांच्या लैंगिक छळाला प्रतिबंध कायदा,2013

या कायद्याचे तीन मुख्य हेतू आहेत.

- **प्रतिबंध** – पूर्व नियोजन आणि वेळेत कृती करून कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळाच्या घटना रोखणे.
- **मनाई** – कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळास मनाई आहे याविषयी सर्व कर्मचाऱ्यांना स्पष्ट कल्पना असणे.
- **निवारण** – आवश्यक ती काळजी घेऊनही कामाच्या ठिकाणी एखाद्या स्त्रीचा लैंगिक छळ झाल्यास त्याचे त्वरित निवारण करणे.

# कामाच्या ठिकाणी स्त्रियांच्या लैंगिक छळाला प्रतिबंध कायदा,2013

- पीडित महिला
- पूर्ण वेळ, अर्ध वेळ, सल्लागार, कॉन्ट्रॅक्टवर असणाऱ्या, पगारी, ऐच्छिक काम करणाऱ्या स्त्री कर्मचारी अशा संबंधित कार्यालयात काम करणाऱ्या सर्व स्त्रिया कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ झाल्यास तक्रार करू शकतात. कार्यालयात काम करणारी स्त्रीच फक्त पीडित स्त्री असते असे नाही. कामाच्या ठिकाणी भेट देणारी, ग्राहक म्हणून आलेली कोणतीही स्त्री तिचा लैंगिक छळ झाल्यास तक्रार करू शकते. कामाच्या ठिकाणी संपर्कात येणारी स्त्री तक्रार दाखल करू शकते – तिला वयाची अट नाही.
- कर्मचारी
- पूर्ण वेळ, अर्ध वेळ, सल्लागार, कॉन्ट्रॅक्टवर असणारे, पगारी, ऐच्छिक काम करणारे, ठेकेदाराने नेमलेले, रोजंदारीवर काम करणारे, घरकाम करणारे ,प्रशिक्षणासाठी आलेले, ऑडिटसाठी आलेले. या सर्वांना कर्मचारी म्हटले जाते. हा ठेकेदाराचा माणूस आहे, आम्ही नेमलेला नाही असं म्हणून एखाद्या स्त्रीच्या तक्रारीबाबत आस्थापनाला हात झटकता येत नाहीत

# कामाच्या ठिकाणी स्त्रियांच्या लैंगिक छळाला प्रतिबंध कायदा,2013

- कामाचे ठिकाण म्हणजे अशा सर्व जागा की ज्याठिकाणी माणसे उत्पादन करतात, सेवा पुरवतात किंवा विक्री करतात. शासकीय, अशासकीय निमशासकीय, शासनपुरस्कृत, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपनी, महामंडळ, सहकारी संस्था, सामाजिक संस्था, उद्योग, कार्यालय, रूग्णालय, विश्रामगृह, वित्त पुरवठा कंपनी, गोदाम, व्यायामशाळा, शैक्षणिक संस्था, स्टेडियम  ही सर्व कामाची ठिकाणे आहेत.
- केवळ महिला कर्मचारी नव्हे तर, अशिल, ग्राहक, प्रशिक्षणार्थी आणि रोजंदारी कामगारी किंवा तदर्थ स्वरूपात काम करनारे, असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्याना   देखील या कायद्याखाली संरक्षण देण्यात आले आहे. शिवाय, महाविद्यालय/विद्यापीठांमधील विद्यार्थी, संशोधन तज्ञ आणि रूग्णालयातील रुग्णांना देखील यात समाविष्ट केले आहे.
- प्रत्येक मालक/कंपनीने त्यांच्याकडे किमान 10 कर्मचारी असतील तर एक अंतर्गत तक्रार समिती (ICC) स्थापन करावयाची आहे. जिल्हा अधिकाऱ्याने स्थापन केलेली एक स्थानिक तक्रार समिती (LCC) 10 पेक्षा कमी कर्मचारी असलेले मालक/ कंपन्यांवर देखरेख करेल.

# कामाच्या ठिकाणी स्त्रियांच्या लैंगिक छळाला प्रतिबंध कायदा,2013

- कामाचे ठिकाण लैंगिक छळापासून मुक्त करण्यात अपयशी ठरणाराकोणताही मालक / कंपनी यांना रु. 50,000 दंड करण्यात येईल. ICC ने लैंगिक छळाचा पुरावा स्पष्ट करणारी तक्रार असेल तर सात दिवसांच्या आत पोलिसांना माहिती द्यावयाची आहे.
- छळ झालेल्या महिला चौकशीच्या कालावधीच्या दरम्यान सुटी आणि/किंवा बदली करून घेऊ शकतात.
- तकार समितीने तीन महिन्यांच्या आत आपली तक्रार पूर्ण करायची आहे आणि जिल्हा अधिकारी/मालकाने दोन महिन्यांच्या आत कारवाई केली पाहिजे.
- छळ झालेली स्त्री किंवा साक्षीदार यांची ओळख आणि पत्ता उघड  करणाऱ्या कोणाही व्यक्तिला रु.5,000 दंड आकारला जाईल.

# पर्यावरण संरक्षण

- भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या औषधे व कीटकनाशकांचा वापर शेतकरी किंवा पुरुष व महिला कामगारांतर्फे केला जाणार नाही.
- किटकनाशके खरेदी करतांना परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावीत.
- अपूर्ण लेबल, घटक पदार्थ नमुद न केलेले, पॅकींगवर लेबल नमुद नसलेले किटकनाशके खरेदी करू नयेत.
- शेतकऱ्यांतर्फे केवळ बी एस आय ने प्रमाणिक केलेली औषधे आणि कीटकनाशके खरेदी करणे गरजेचे आहे.
- कुठल्याही प्रकारचे वायू अथवा जल प्रदूषण होऊ नये यासाठी अधिकची औषधे व कीटकनाशकांची विल्हेवाट लावणे तसेच कीटकनाशके साठवणूक करणारी साधने स्वच्छ करणे, किटकनाशकाकरिता वापरलेले भांडे खाद्यपदार्थ व पेयजलकरिता न वापरणे यासंदर्भात शेतकऱ्यातर्फे पुरुष आणि महिला कामगारांना आवश्यक ते प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.
- शेतकऱ्याने मुदत बाह्य असलेली औषधे वा किटकनाशके खरेदी करू नयेत.
- औषधे व किटकनाशके हाताळतांना शेतकऱ्याने त्याबरोबर दिलेल्या आवश्यक त्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे.
- शेतकऱ्यांनी सूक्ष्म जीव अन्नद्रव्यांचा (Microbial Bio- Pesticides/Insect Pheromonoes) वापर करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.



# ५ . तक्रार निवारण व्यवस्थापन



पारदर्शकता आणि जबाबदारीला प्रोत्साहन देण्यासाठी



लाभार्थी आणि नागरिक जागरूकता/प्रकल्पातील सहभाग सुनिश्चित करण्यासाठी, कार्यक्षमतेत वाढ करणे

तत्व

गुप्तता

नि:पक्षपातीपणा

पारदर्शकता

# तक्रार निवारण व्यवस्थापन

१. तक्रार निवारण अधिकारी(**GRO**) आणि अपीलीय प्राधिकारी **Appellate Authority (AA)** यांचे नामनिर्देशन

- प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष **PCMU,**
- प्रकल्प अंमलबजावणी कक्ष **PIU,**
- विभागीय अंमलबजावणी कक्ष **RIU** आणि
- जिल्हा अंमलबजावणी कक्ष **DIU**

३




1800 210 1770

२. **mahasmart.grm@gmail.com**

# विविध स्तरावरील तक्रार निवारण अधिकारी(GRO) आणि अपिलीय प्राधिकारी Appellate Authority (AA)

**जिल्हा अंमलबजावणी कक्ष**

**DIU**

- तक्रार निवारण अधिकारी- नोडल अधिकारी स्मार्ट (उपसंचालक आत्मा)
- अपिलीय प्राधिकारी- प्रमुख (जिल्हा प्रकल्प संचालक आत्मा)

**विभागीय अंमलबजावणी कक्ष**

**RIU**

- तक्रार निवारण अधिकारी- नोडल अधिकारी स्मार्ट (अधिक्षक कृषि अधिकारी)
- अपिलीय प्राधिकारी- प्रमुख (विभागीय कृषि सहसंचालक)

**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष**

**PIU**

- तक्रार निवारण अधिकारी- नोडल अधिकारी स्मार्ट
- अपिलीय प्राधिकारी- प्रमुख

**प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष**

**PCMU**

- तक्रार निवारण अधिकारी- समन्वयक स्मार्ट
- अपिलीय प्राधिकारी- अतिरिक्त प्रकल्प संचालक स्मार्ट

# तक्रार निवारण अधिकारी यांची जबाबदारी

1 प्राप्त सर्व तक्रारीची (लिखित तक्रार व ई-मेल द्वारे) नोंद घेण्याकरीता विहीत प्रपत्रातील तक्रार निवारण रजिस्टर ठेवून प्राप्त तक्रारींची नोंद त्यामध्ये घेणे

2 विहीत कालावधीत तक्रारीचे निवारण करणे

3 दरमहा प्रकल्पाच्या एमआयएस प्रणालीमध्ये याबाबत माहिती सादर करणे

# अपिलीय प्राधिकारी यांची जबाबदारी

1

सर्वे तक्रारीचे विहीत वेळेत निवारण करण्याकरीता सनियंत्रण करणे

2

दरमहा प्रकल्पाच्या एमआयएस प्रणालीमध्ये याबाबत माहिती सादर करण्याबाबत खातरजमा करणे

दूरध्वनी व भ्रमणध्वनी

ई मेल

लेखी तक्रार

**टोल फ्री नंबर**

तक्रारकर्ता वेगवेगळया माध्यमाद्वारे तक्रार दाखल करु शकतो

# तक्रारीचे निवारण - कार्यपध्दती

- सर्व संबंधित कार्यालयामध्ये तक्रार निवारण अधिकाऱ्यांची नावे व दूरध्वनी नंबर हे प्रकल्पाच्या वेबसाईटवर व इतर महत्वाच्या दर्शनीय ठिकाणी प्रदर्शित करण्यात येतील.

- तक्रार निवारण रजिस्टर

| अनु क्र | नाव व पत्ता | तक्रारीचे स्वरूप | तक्रार प्राप्त दिनांक | तक्रारीचा टोकन क्र. | तक्रारकर्त्यास तक्रारीची पोच दिल्याचा दिनांक | तक्रारीचे उत्तर दिल्याचा दिनांक | तक्रार निवारण अधिकारी स्वाक्षरी | अपिलीय प्राधिकारी स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

Continue…

- तक्रार प्राप्त झालेल्या दिवसापासून ०३ दिवसाच्या आत तक्रारकर्त्यास तक्रार प्राप्त झाल्याची लेखी  ईमेलद्वारे पोच देणे टोकन कम्प्लेंट नंबरसहीत
- विहीत कालावधीत तक्रारीचे निवारण करणे
- एखादया स्तरावर संबंधित नसलेले तक्रार प्राप्त झाल्यास त्या तक्रार निवारण अधिकाऱ्यांनी सदर तक्रार योग्य ठिकाणी अग्रेषित करणे तसेच सदर माहिती संबंधित तक्रार कर्त्यास कळविणे
- जर तक्रारकर्त्याला तक्रारीचे निवारण समाधानकारक वाटत नसेल तर ते पुढील स्तरावर तक्रार दाखल करु शकतात.

# तक्रार निवारण व्यवस्थापन

| अ.क्र. | पदनाम | नामनिर्देशीत पद | तक्रार निवारण कालावधी |
|---|---|---|---|
| **प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष (PCMU)** | | | |
| **तक्रार निवारण समिती** | | | 07 दिवस |
| 1 | समन्वयक (सनियंत्रण व मुल्यमापन) | तक्रार निवारण अधिकारी | |
| 2 | अतिरिक्त प्रकल्प संचालक | अपिलीय प्राधिकारी | |
| **प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) - राज्य स्तर** | | | |
| **तक्रार निवारण समिती** | | | 07 दिवस |
| 1 | नोडल अधिकारी | तक्रार निवारण अधिकारी | |
| 2 | संबंधित विभाग प्रमुख - व्यवस्थापकीय संचालक/ संचालक/ आयुक्त/ मुख्य कार्यकारी अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | |
| **विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, विभाग स्तर - (RIU)** | | | |
| **तक्रार निवारण समिती** | | | 07 दिवस |
| 1 | नोडल अधिकारी, विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तथा अधिक्षक कृषि अधिकारी | तक्रार निवारण अधिकारी | |
| 2 | प्रमुख, विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तथा विभागीय कृषि सहसंचालक | अपिलीय प्राधिकारी | |
| **जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, जिल्हा स्तर - (DIU)** | | | |
| **तक्रार निवारण समिती** | | | 10 दिवस |
| 1 | नोडल अधिकारी, जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तथा उपसंचालक, आत्मा | तक्रार निवारण अधिकारी | |
| 2 | प्रमुख, जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तथा जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा | अपिलीय प्राधिकारी | |

# Social Sreening Report (Page 2)



## सोशल स्क्रिनिंग चेकलीस्ट (तपासणी सूची)

समुदाय आधारीत संस्थेचे नाव -
उपप्रकल्प ठिकाण - जिल्हा/तालुका/ क्लस्टर -
संपूर्ण पत्ता व अक्षांश आणि रेखांश माहिती -

उप प्रकल्पाचे नाव-
उप प्रकल्पातील प्रस्तावित उपक्रम -

उप प्रकल्पातील पायाभूत सुविधेकरीता जागेची गरज (एकर मध्ये) -
तपशील-

| जागेचा वापर, पुनर्वसन आणि [illegible]गा संपादन व आदिवासी कार्यक्षेत्र याबाबत माहिती : | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशील | होय | नाही | होय असल्यास तपशील द्यावा |
| १ | या उप-प्रकल्पांमधील उपक्रमांकरीता खाजगी जागा विकत घेणे प्रस्तावित आहे का? | | | |
| २ | या उपप्रकल्पांमधील- उपक्रमांकरीता ग्रामपंचायत अथवा शहरी स्थानिक संस्था यांच्या जागेचे हस्तांतरण प्रस्तावित आहे का? | | | |
| ३ | प्रस्तावित जागेवर अतिक्रमण नसल्याचे ग्रामपंचायत/संबंधित शासकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतले आहे का? | | | |
| ४ | प्रस्तावित जागेवर कोणत्याही प्रकारची घुसखोरी झालेली नाही याबद्दल ग्रामपंचायत/संबंधित शासकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतले आहे का? | | | |
| ५ | सदर जागेवर कायदेशीर व बेकायदेशीर स्थलांतरीत कराव्या लागणाऱ्या रचनांची (उपजीविकेचे साधन उदा.टपरी, दुकान इ.) संख्या? | | | |
| ६ | उपप्रकल्पांमधील उपक्रमामुळे स्थलांतरीत कराव्या लागणाऱ्या कुटुंबांची संख्या? | | | |
| ७ | उपप्रकल्पांमधील उपक्रमांकरीता सामूहीक मालमत्ता जसे की, गायरान जमिन, स्मशान भूमी/दफनभूमी इ. चे हस्तांतरण प्रस्तावित आहे का? | | | |
| ८ | उपप्रकल्पात निवडलेल्या जागेचा व आजूबाजूच्या जागेचा वापर कशाकरीता होतो ? (उदा. सामुदायिक सुविधा, शेती, पर्यटन, खाजगी मालमत्ता) | | | |
| ९ | उपप्रकल्पांमधील उपप्रकल्पामुळे खालील नमूद बाबींची कायमस्वरूपी किंवा तात्पुरती हानी होणार का?<br>पिके, फळझाडे,किरकोळ दुकाने, भाजीपाला/ मासे/मटण विक्री, सायकल दुरुस्ती दुकान, गॅरेज, चहाचे दुकान, गायरान जमीन, इ. | | | |
| १० | उप-प्रकल्पातील उपक्रमामुळे स्थानिक पातळीवरील लोकांना (महिला व पुरुष) रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे का? | | | |
| ११ | उप-प्रकल्पातील उपक्रमामुळे स्थानिक पातळीवर दारिद्रय निर्मूलनाचे लक्ष्य साध्य होण्यास मदत होणार आहे का? | | | |
| १२ | उप-प्रकल्प आराखडा नियोजनामध्ये व अंमलबजावणीमध्ये स्थानिक लोकांचा (महिला व पुरुष) यांचा पुरेसा सहभाग घेतला जा[illegible]ार आहे का? | | | |
| १३ | उप-प्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांची प्र[illegible]तावित संख्या? | | | |
| १४ | उप-प्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या महिलांची प्रस्तावित संख्या? | | | |
| १५ | उप-प्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या वंचित कुटुंबे/ लाभार्थ्यांची प्रस्तावित संख्या? | | | |

# Social Sreening Report (Page 2)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | उप-प्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबे/ लाभार्थ्यांची प्रस्तावित संख्या? | | | |
| १७ | उप-प्रकल्प क्षेत्र परिशिष्ट-v क्षेत्रातील ( आदिवासी जिल्हे व तालुके) आहे का[१]? | | | |
| अ | राष्ट्रीय व स्थानिक कायद्यानुसार/धोरणानुसार व मानववंश शास्त्राच्या अभ्यासानुसार उपप्रकल्पातील लोक/समूह "आदिवासी लोक/समूह/ डोंगराळ जमाती, अनुसूचीत जमाती" म्हणून ओळखले जातात का? | | | |
| ब | उपप्रकल्पातील हा समुदाय स्वत:ला प्रस्थापितापेक्षा भिन्न/वेगळया सामाजिक व सांस्कृतिक घटकाचा मानतो का? | | | |
| क | उपप्रकल्पातील हा समुदाय एकत्रपणे वेगळी वस्ती करुन राहतो का?/ वंशपंरपंरागत क्षेत्रात राहतात का? व नैसर्गिक संसाधने यांचेशी सामूहीक संलग्नता जोडून आहेत का? | | | |
| ड | उपप्रकल्पातील हा समुदाय प्रस्थापितापेक्षा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय पातळीवर वेगळेपणा राखून आहेत का? | | | |
| इ | उपप्रकल्पातील आदिवासी लोकांची बोलीभाषा प्रस्थापितापेक्षा वेगळी आहे का? | | | |
| ई | उपप्रकल्पातील हा समुदाय ऐतिहासिकदृष्ट्या, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या उपेक्षित. वंचित, वगळले गेले आहेत आणि / किंवा त्यांच्याशी भेदभाव केला गेला आहे असा आहे का? | | | |
| १८ | उपप्रकल्पातील हया प्रकारचा समुदाय "आदिवासी लोक/समूह" म्हणून कोणत्याही राष्ट्रीय अथवा स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेसंबंधी गठीत औपचारीक समितीमध्ये प्रतिनिधित्व करतो का? | | | |
| १९ | उप-प्रकल्पांमार्फत सदर आदिवासी समुदायाला अप्रत्यक्ष अथवा प्रत्यक्ष लाभ होणार आहे का? | | | |
| २० | उप-प्रकल्पातील उपक्रमामुळे आदिवासी लोकांच्या रुढी व पारंपरिक तसेच सामाजिक संस्कृतीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे परिणाम होणार आहे का? (उदा. बालसंगोपन, शिक्षण, आरोग्य, कला इ.) | | | |
| २१ | या उप-प्रकल्पातील उपक्रमामुळे आदिवासींच्या उदरनिर्वाह तसेच जीवनमान प्रणालीवर परिणाम होणार आहे का? (उदा.अन्न उत्पादन प्रणाली, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हस्तकला आणि व्यापार, रोजगाराची स्थिती) | | | |
| २२ | उप-प्रकल्प हा आदिवासी लोकांच्या ताब्यात असलेल्या व त्यांच्या मालकीच्या व वापरात असलेल्या जागेमध्ये आहे का? | | | |

**सत्यता पडताळणी व प्रमाणित अधिकारी -**

जिल्हा नोडल अधिकारी/प्रकल्प अंमलबजावणी कक्ष अधिकारी/विभागीय कक्ष अंमलबजावणी अधिकारी

**अधिकाऱ्याचे नाव :**

**पदनाम:**

**कार्यालयाचे नाव :**

**दिनांक**

**स्वाक्षरी**

---

*1आदिवासी जिल्हे व तालुके यांची यादी पुढील संकेतस्थळावर उपलब्ध -*
*https://cdnbbsr.s3waas.gov.in/s3c8758b517083196f05ac29810b924aca/uploads/2019/11/2019112132.pdf*

# Social Action Plan (Page 1)

प्रपत्र -७

## सामाजिक कृती आराखडा

१. सामाजिक कृती आराखडा अंमलबजावणीकरीता जबाबदार व्यक्तीचे नाव -

| तपशील | होय/ नाही | ( होय असल्यास माहिती नमूद करा) |
|---|---|---|
| २. उप-प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्राची माहिती | | |
| उप-प्रकल्प क्षेत्र अनुसूचित *Schedule V*[2] (आदिवासी) क्षेत्रामध्ये आहे का? | | |
| उप-प्रकल्पांमध्ये विशेषतः असुरक्षित आदिवासी गट (Particularly Vulnerable Tribal Groups) आहेत का?[3] | | |
| उप-प्रकल्प क्षेत्र डावे विंग अतिरेकी[4]/नक्षलवादी (Left Wing Extremism) क्षेत्रामध्ये येते का? | | |
| उप-प्रकल्प क्षेत्र आकांक्षी जिल्हा (Aspirational District) अंतर्गत येते का?[5] | | |
| ३. नकारात्मक यादीचे अनुपालन (Compliance with Negative List) | | |
| या उप-प्रकल्पांमधील उपक्रमांकरीता खाजगी जागा ताब्यात घेणे अनिवार्य आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांमधील उपक्रमांकरीता खाजगी जागा विकत घेतली जाणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांतील उपक्रमांमुळे लोकांचे तसेच घरे, दुकाने, इमारती, इ.चे स्थलांतरण होणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांतील उपक्रमांमुळे सामान्य मार्ग, सुविधा व संसाधने वापरण्याची संधी बंद होणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांतील उपक्रमांमुळे स्थानिक उदरनिर्वाह व व्यवसायांवर विपरित परिणाम होणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये Schedule V (अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेली) क्षेत्रातील गावामध्ये आदिवासी समाजाला प्रकल्पाची माहिती देण्याकरीता पुर्वसूचना देवून विनाशुल्क चर्चा केली नाही असे आहे का? | | |
| या उप प्रकल्पांमध्ये Schedule V (अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेली) क्षेत्रातील अशी गावे आहेत का जेथे आदिवासी समाजाची व्यापक स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी करीता संमती मिळाली नाही? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा कोणत्याही उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे आदिवासी समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक श्रद्धा, प्रथा आणि त्यांच्या उदरनिर्वाहावर नकारात्मक परिणाम होऊ शकेल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे पुरातत्व, ऐतिहासिक व सांस्कृतिक मालमत्तेवर विपरित परिणाम होऊ शकेल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामध्ये बाल कामगार,[6] वेठबिगार[7] किंवा इतर कामगारांचे शोषण करण्याच्या पध्दतीचा अवलंब असेल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये खोल खोदकाम कामे, घातक रसायने, स्फोटके, धोकादायक स्थळे संबंधित उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे कामगार आणि स्थानिक समुदायांचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात येईल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये बांधकाम किंवा प्रकल्प् अंमलबजावणीदरम्यान कामगाराकरीता काही धोकादायक कामांचा समावेश आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे महिला, मुले आणि मुली यांचे हित, आरोग्य व सुरक्षा यांस हानी पोहोचेल? | | |
| ४. उपप्रकल्प अंमलबजावणी | | |
| ४.१ उप-प्रकल्पांमध्ये वंचित घटकांचा समावेश | | |
| उप-प्रकल्पांमध्ये वंचित शेतकरी कुटंब, (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला प्रधान कुटुंब, इ.) वंचित कामगार, भाडेतत्वावर शेती करणारे कुटुंब, परत आलेले स्थलांतरीत कुटुंब इ. यांना समाविष्ट करुन घेण्याकरीता विशेष प्रयत्न प्रस्तावित आहेत का? | | |

---

[2] *Schedule V जिल्हा- ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर.*

[3] *असुरक्षित आदिवासी गट- कटकारिया (कठोडिया), कोलम, मारिया गोंड*

[4] *डावे विंग अतिरेकी/नक्षलवादी क्षेत्र - चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया*

[5] *आकांक्षी जिल्हे- नंदुरबार, वाशिम, गडचिरोली, उस्मानाबाद*

[6] *14 वर्षाखालील बालकांना बालकामगार असे संबोधले जाते.*

[7] *वेठबिगार :निराधार, दुर्बल, परावलंबी व असंघटित व्यक्तींच्या अज्ञानाचा व दुबळेपणाचा गैरफायदा उठवून, त्यांना अंकित करुन, त्यांच्या इच्छेविरुध्द सक्तीने व योग्य मोबदला न देता किंवा विनामोबदला पडेल त्या कामाकरिता राबवून घेणे म्हणजे वेठबिगार.*

# Social Action Plan (Page 2 )

| | | |
|---|---|---|
| **४.२ आदिवासी क्षेत्रातील उपप्रकल्प** | | |
| आदिवासी समुदायाला उपप्रकल्पाची माहिती देण्याकरीता पूर्वसूचना देवून मोफत मार्गदर्शन केले आहे का? | | |
| उपप्रकल्प अंमलबजावणीसाठी आदिवासी समुदायाची संमती प्राप्त झाली आहे का? | | |
| उपप्रकल्पाचे फायदे आदिवासी समुदायापर्यंत पोहोचतील याची खातरजमा केली जाणार का? | | |
| **४.३ जमिन** | | |
| ७/१२ चा उतारा किंवा खासगी जमीन २९ वर्षाकरीता भाड्याने लीज/वर घेतल्याचा नोंदणीकृत भाडेकरार सोबत जोडला आहे का? | | |
| जागेचे अतिक्रमण नसलेले संबंधित अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे का? . (जिल्हा अंमलबजावणी यंत्रणा प्रमुख /ग्रामपंचायत / तलाठी इ. संबंधित) | | |
| **४.४ पायाभूत सुविधा** | | |
| कामगारांच्या आरोग्य आणि सुरक्षा सुविधां करीता काही उपाययोजना प्रस्तावित आहे का? (कामगार शिबिरादरम्यान ) {उदा. राहण्यासाठी पुरेशी जागा, स्वच्छता सुविधा, पिण्याचे पाणी, पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र स्वक्षतागृहे, मुलांसाठी पाळणाघर/स्वतंत्र शेड, महिलांच्या लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३) संदर्भात माहिती देणे/जागरुकता आणणे. } | | |
| बाहेरून येणाऱ्या कामगारांमुळे नि र्माण झालेल्या जोखीमा टाळण्याकरीता उपाययोजना प्रस्तावित आहे का? (उदा. गुन्हे, संसर्गजन्य आजार, लिंग आधारीत हिंसाचार, बालकामगार इ. रोखण्याकरीता उपाययोजना) | | |
| लिंग–आधारित हिंसा व लैंगिक छळ रोखण्याकरीता उपाययोजना प्रस्तावित आहेत का? (उदा अंतर्गत समितीची स्थापना) | | |
| **४.५ कामगार व समुदाय आरोग्य आणि सुरक्षा** | | |
| समुदाय आरोग्य आणि सुरक्षा यावर काही उपाययोजना प्रस्तावित आहेत का? (उदा. शारीरिक इजा, अपघात, लैंगिक छळ, इ. रोखण्याकरीता उपाययोजना) | | |
| कामगार आरोग्य आणि सुरक्षा यावर काही उपाययोजना प्रस्तावित आहेत का? ? (उदा. कामाच्या ठिकाणी अपघात,शारीरिक इजा, लैंगिक छळ, इ. रोखण्याकरीता उपाययोजना) | | |
| कोविड–१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षा उपाययोजना प्रस्तावित आहेत का? (उदा. सुरक्षित अंतर, मास्कचा वापर, इ.) | | |

५. उप-प्रकल्प उद्दीष्टय :

| अ. क्र | तपशील | समुदाय आधारित संस्थेची सद्यस्थिती | उप-प्रकल्पाचे उद्दीष्टय |
|---|---|---|---|
| | **उपप्रकल्पांमध्ये विविध घटकांचा समावेश** [८] | | |
| i | **एकूण शेतकरी/सदस्य संख्या** | | |
| ii | **अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी संख्या (व टक्केवारी)** | | |
| iii | **महिला भागधारक संख्या (व टक्केवारी)** | | |
| iv | **महिला संचालक संख्या (व टक्केवारी)** | | |
| v | **अनुसूचित जाती सदस्य संख्या (व टक्केवारी)** | | |
| vi | **अनुसूचित जमाती सदस्य संख्या (व टक्केवारी)** | | |
| vii | **भाडेतत्वावर शेती करणारे सदस्य संख्या (व टक्केवारी)** | | |
| vii | **भूमिहीन सदस्य संख्या (व टक्केवारी)** | | |
| ix | **७/१२ नावावर असणाऱ्या महिलांची संख्या (व टक्केवारी)** | | |

*8 प्रकल्पाच्या सामाजिक विकास धोरणानुसार प्रकल्प अखेरीस प्रकल्पातील एकूण लाभार्थ्यांपैकी 80% अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी, किमान 30% महिला लाभार्थी, किमान 6 अनुसूचित जमाती, किमान 7% अनुसूचित जाती, तसेच समुदाय आधारित संस्थांमध्ये किमान 20% महिला संचालक लाभार्थी अनिवार्य आहे. .*







# धन्यवाद !

श्री. आशिष दुधे
समाज विकास तज्ञ,
विभागीय अमलबजावणी कक्ष, नागपुर
मो. नं.  ७९७२९५३६८९